जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २३.०९.२०२५**

''गांजा विक्री करणाऱ्या २ आरोपींना अटक ''

दिनांक १७/०९/२०२५ रोजी २ इसम गांजा हा अमली पदार्थ विक्री करण्याकरिता (के. बी. चौकी, भिवंडी ते ताडाळी रोड दरम्यान) येणार असल्याची सपोउनि/सुनिल साळुंखे यांना माहिती मिळाली होती. सदरच्या बातमीबाबत त्यांनी गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडी येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. जनार्दन सोनवणे यांना अवगत केले असता त्यांच्या मार्गदर्शनाखाली पथक नेमुन वरिष्ठांच्या योग्य त्या कायदेशिर परवानगी घेवुन पंचांच्या समक्ष सदर ठिकाणी सापळा रचुन छापा कारवाई करण्यात आली. सदर कारवाईत आरोपी १) प्रशांत उर्फ सलाड सुरेश तायडे वय २७ वर्षे, रा. टिटवाळा, ता. कल्याण, जि. ठाणे व २) सोहेल उर्फ पित्तल इरफानअली अन्सारी वय २० वर्षे, राह. भिवंडी यांना **४ किलो ८२७ ग्रॅम वजनाचा गांजा** हा अंमली पदार्थ व यामाहा कंपनीची फसिनो स्कुटर यासह एकुण ०३,५४,८००/- रुपये किमतीच्या मुद्येमालासह ताब्यात घेतले आहे. त्यांच्या विरुद्ध भिवंडी शहर पोलिस ठाणे, गुन्हा रजि. नं. ८६६/२०२५, एन. डी. पी. एस. ॲक्ट १९८५, कलम ८ (क), २० (ब), ।। (ब), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान आरोपींनी सदरचा गांजा हा अमली पदार्थ कोठुन आणला याची बॅकवर्ड लिंक शोधत असताना आरोपी प्रशांत उर्फ सलाड सुरेश तायडे याचे घरझडतीमध्ये **अवैध माऊझर/पिस्टल व ०१ जिवंत काडतुस** असा गुन्हयात **एकुण ३,८५,१००/- रू. किमतीचा मुद्येमाल हस्तगत** करण्यात आला आहे. सदर आरोपी हे दि. २४/०९/२०२५ पर्यंत पोलीस कोठडीमध्ये असुन गुन्हयाचा पुढील तपास गुन्हे शाखा, घटक - २, भिवंडी कडुन सुरू आहे.

सदरची कामगिरी श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे शोध - १ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक- २ भिवंडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.जनार्दन सोनवणे, सपोनि/श्रीराज माळी, सपोनि/मिथुन भोईर, पोउनि/रविंद्र बी. पाटील, पोउनि/राजेश शिंदे, पोउनि/रामचंद्र जाधव, सपोउनि/सुधाकर चौधरी, सपोउनि/सुनिल साळुंके, पोहवा/ निलेश बोरसे, साबीर शेख, सुदेश घाग, किशोर थोरात, वामन भोईर, राजेश गावडे, मपोहवा/६८३३ माया डोंगरे, पोशि/अमोल इंगळे, भावेश घरत, सर्फराज तडवी, चापोशि/रविंद्र साळुंखे यांनी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर